# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. ५९

School Council Education

कार्यक्रम पत्रिका

दिनांक – १३.१२.२०२३

वेळ – सकाळी १०.३० वा.

स्थळ

झूम दूरदृश्य प्रणाली (ONLINE)

**Zoom Meeting**

**Meeting ID:** 89022358707

**Passcode:** edu@YCMOU

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

### शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

**बैठक क्र. ५९ दिनांक. १३.१२.२०२३**

**इतिवृत्त**

| अ.क्र. | सहपत्र | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 01 | बैठक क्र. ५८ च्या परिषदेचे इतिवृत्त **(सहपत्र-1)** | 1.1 – 1. |
| 02 | बैठक क्र. ५८ च्या परिषदेच्या कार्यवाही अहवाल. **(सहपत्र-2)** | 2.1 – 2. |
| 03 | पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाकडून पीएच.डी दूर शिक्षण क्षेत्र बदल करणेबाबत.. **(सहपत्र-3)** | 3.1 – 3. |
| 04 | NEP 2020 मार्गदर्शक सूचननांनुसार एम.एम शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम,पाठ्यक्रम **(सहपत्र-4)** | 4.1 – 4. |
| 05 | अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य-टिप्पणी **(सहपत्र-5)** | 5. 1 – 5.5 |
| 06 | आंतरवासिता-टिप्पणी **(सहपत्र-6)** | 6.1 – 6. |
| 07. | एम.ए. शिक्षणशास्त्र मूल्यमापन योजना **(सहपत्र - 7)** | 7.1 – 7. |
| 08. | एकात्मिक बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.बी.एड.संरचना **(सहपत्र-8)** | 8.1 – 8. |
| 09. | शिक्षणक्रमनिहाय प्राश्निक परीक्षक समीक्षक मान्यता **(सहपत्र-9.1 ते 9.3)** | 9.1 – 9. |
| 10. | शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र,बी.एड.विशेष बी.एड. शिक्षण,शालेय व्यवस्थापन पदविका प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावास मान्यते बाबत **(सहपत्र-10)** | 10.1-10. |
| 11. | विशेष बी.एड. सामंजस्य करार केलेल्या शाळेस प्रात्यक्षिक कार्य खर्च देण्याबाबत.... **(सहपत्र-11)** | 11.1-11. |
| 12. | बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२७ पासून प्रवेश परीक्षा घेण्याबाबत... **(सहपत्र-12)** | 12.1 – 12. |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा
### शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
**बैठक क्र. ५९ दिनांक. १३.१२.२०२३**
### इतिवृत्त

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 01 | बैठक क्र. ५८ च्या परिषदेचे इतिवृत्त कायम करणे. (५९.१) |
| 02 | बैठक क्र. ५८ च्या परिषदेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे..(५९.२ ) |
| 03 | पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाकडून पीएच.डी दूर शिक्षण क्षेत्र बदल करणेबाबत.. (५९.३) |
| 04 | NEP 2020 मार्गदर्शक सूचननांनुसार एम.ए. शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम अध्यापन व क्षेत्रीय कार्य आंतरवासिता आणि मूल्यमापन योजनेला मान्यता देणेबाबत (५९.४.१ ते ५९.४.१) |
| 05 | बीएड शिक्षणक्रम सन 2024 शिक्षणक्रम प्रवेश नियमावली (५९.५) |
| 06 | ITEP एकात्मिक बी.ए.बी.एड., बी.एस्सी.बी.एड्. आणि बी.कॉम. बी.एड. शिक्षणक्रम नियमित पद्धतीने सुरु करणेसाठी तयार केलेली संरचना मान्यतेबाबत (५९.६) |
| 07 | विद्याशाखेताल सर्व शिक्षणक्रम प्राश्निक समिक्षक यादी मान्यतेसाठी (५९.७.१ ते ५९.७.३) |
| 08 | यचममुवि ग्रंथ दालन (YCMOU BOOK CORNER) योजने मान्यतेबाबत (५९.८) |
| 09 | विशेष बी.एड. सामंजस्य करार केलेल्या शाळेस प्रात्यक्षिक कार्य खर्च देण्याबाबत...(५९.९.१) |
| 10 | बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२७ पासून प्रवेश परीक्षा घेण्याबाबत...(५९.९.२) |
| 11 | ऐनवेळी विषय..... |

School of Education

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. ५९ दिनांक. १३.१२.२०२३

**इतिवृत**

---

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५९ दि. १३.१२.२०२३ रोजी दु. १०.३० ते ०१.३० या वेळेत online व offline पद्धतीने घेण्यात आली. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष आणि बहिस्थ सदस्य online पद्धतीने उपस्थित होते.

**प्रत्यक्ष उपस्थिती**

१. प्रा. संजिवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
२. डॉ. लतिका गायकवाड. सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा.
३. डॉ. दयाराम डी. पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
४. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
५. डॉ. साधना तांदळे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
६. श्री. शिवानंद कहाळेकर, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
७. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा (सचिव )

**दूरदृश्य प्रणाली (online)**

१. डॉ.भरतभाई जोशी, कुलगुरु, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
२. डॉ. अमृत भरवाड, वरिष्ठ प्राध्यापक, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
३. डॉ. कविता साळुंके, संचालक ऑनलाईन लर्निंग विद्याशाखा.
४. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, प्राध्यापक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
५. डॉ. चेतना सोनकांबळे, प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.
६. डॉ. निशा वळवी, सहयोगी प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
७. डॉ. चेतना कामळस्कर , संचालक, विज्ञान विद्याशाखा.
८. श्रीमती. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
९. श्री. ज्ञानेश्वर जाधव, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार. CDS.

काही वैयक्तिक अडचणीमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

१. डॉ. संजय चाकणे, पुणे. ( विद्वत परिषद सदस्य )
२. प्रा. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. ५९ दिनांक. १३.१२.२०२३

**इतिवृत्त**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची २०२३ या वर्षातील तृतीय बैठक क्र. ५९, दि. १३.१२.२०२३ रोजी सकाळी ११.३० या वेळेत Online पध्दतीने आयोजित केली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे-

| क्रमांक | विषय |
|---|---|
| ५९ | **उपस्थित सदस्यांचे स्वागत** |
| ५९.१ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 01**<br>बैठक क्र. ५८ च्या परिषदेचे इतिवृत्त मान्यता **(सहपत्र 1 )**<br>**निर्णय** — शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५८ इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| ५९.२ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 02**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे **( सहपत्र 2)**<br>**निर्णय** — शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५८ कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| ५९.३ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178/ 2023/ 03**<br>**पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाकडून पीएच.डी दूर शिक्षण क्षेत्र बदल करणेबाबत..**<br>श्री. उमेश कुमावत हयांनी सन 2019 या तुकडीत पीएच.डी शिक्षणशास्त्र विषयासाठी प्रवेश घेतलेला आहे. यासाठी विद्यार्थांकडे शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी असणे अत्यावश्यक आहे. परंतु त्यांच्याकडे शिक्षणशास्त्रातील पदवी आणि पदव्युत्तर पदवी नाही.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत पीएच.डी **दूर शिक्षण** ह्या विषयात दिली जाते. या विषयासाठी कोणत्याही विषयातील पदव्युत्तर पदवी असणारा विद्यार्थी प्रवेशास पात्र आहे.<br>सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्याला पीएच.डी शिक्षणशास्त्र या विषयातील प्रवेश वर्ग करण्यास दूरशिक्षण या विषयात प्रवेश देण्यास मा. कुलगुरुंकडून मान्यता घेण्यात आलेली आहे.<br>**टिपणी -**<br>१. श्री. उमेश कुमावत ह्यांचा पीएच.डी. शिक्षणशास्त्र प्रवेश रद्द करुन तो पीएच.डी दूर शिक्षण या विषयात वर्ग करण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.<br>२. विद्यार्थ्यांने पीएच.डी शिक्षणशास्त्र कोर्समधील समान अभ्यासक्रमाचे गुण संक्रमित करण्यात यावेत. जे अभ्यासक्रम वेगळे आहेत त्याची अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षा सहशुल्क ( रु. 1000/-) घेण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.<br>३. विद्यार्थ्यांने पीएच.डी शिक्षणशास्त्र / विषयासाठी भरलेले रु. 25000/- शुल्क दूर शिक्षण विषयासाठी वर्ग करण्यास मान्यता द्यावी.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>श्री उमेश कुमावत ह्यांच्या पीएच.डी. प्रवेश शिक्षणशास्त्र विषयाकडून पीएच.डी. दूरशिक्षण करण्यास, कोर्सवर्कमधील विषय बदल वेगळ्या विषयाचे अंतर्गत कार्य व अंतिम परीक्षा आणि पूर्वीचे शुल्क ग्राह्य धरण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.<br>**(सहपत्र 3)** |

**निर्णय –**

१. पीएच.डी दूर शिक्षण या विषयात प्रवेश कार्योत्तर मान्यता देण्यास आली.

१.१. रद्द ऐवजी वर्ग करावा हा शब्द प्रयोग वापरावा शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद सदस्यांनी नवीन विषयासाठी प्रवेश त्याचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यातच कालावधी काय असेल याबाबत विचारणा केली.

२.२. पीएच.डी प्रवेश एका विषयातून दुसऱ्या विषयात वर्ग करतानाचे नियमावली विकसित करावी असे मत मांडले.

५९.४ **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 4**

**NEP 2020 मार्गदर्शक सूचननांनुसार एम.ए. शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम, क्षेत्रीय कार्य आंतरवासिता आणि मूल्यमापन योजनेला मान्यता देणेबाबत..**

(५९.४.१) NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार एम.ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची संरचना मांडणी करण्यात आलेली आहे. त्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद ५८.४ दि. ०३.१०.२०२३ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एन २०२२ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमाचे साहित्य विकसित करण्यात आलेले आहे. त्याच्या पाठ्यक्रमास मान्यता देणेबाबत.

UGC ने एका श्रेयांकासाठी ३-४ घटक असावेत असे मार्गदर्शन केलेले आहे. सत्रनिहाय नवीन अभ्यासक्रमांची नावे पुढीलप्रमाणे आहे. पाठ्यक्रम विकसन समितीची बैठक घेऊन पाठ्यक्रम विकसन करण्यात आलेला आहे. त्यातील शैक्षणिक उद्योजकता या अभ्यासक्रमाच्या पाठक्रम विकसन समितीची प्राथमिक बैठक घेण्यात आलेली आहे.

**सत्र -1-** 1) शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्वे (2 श्रेयांक )
**सत्र -2 -** 2) ग्रंथालय आणि अध्ययन संसाधने (2 श्रेयांक )
**सत्र -3 -** 3) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (4 श्रेयांक)
**सत्र -4 -** 4) शैक्षणिक उद्योजकता –( 4 श्रेयांक)

सन २०२२ मध्ये विकसित झालेले अभ्यासक्रम आणि नवीन चार अभ्यासक्रमांचे घटक व उपघटक सहपत्र 4 मध्ये देण्यात आलेले आहेत. सर्व अभ्यासक्रमांचा पाठयक्रम मान्यतेसाठी सादर...

**सहपत्र- 4**

**(५९.४.२)** NEP 2020 प्रमाणे पदव्युत्तर शिक्षणक्रम कार्यान्वत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १६ मे २०२३ शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-3 शिकाना शासन निर्णय दिलेला आहे. त्यात द्वितीय सत्रासाठी OJT अंतर्गत 2 श्रेयांकांचे अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य आणि २ श्रेयांकाचे आंतरवासिता देण्यासाठी ५८ शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद विषय क्र. ५८.४.१ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. क्षेत्रीय कार्याबाबत महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील बी.एड् शिक्षणक्रमाच्या तात्विक आणि प्रात्यक्षिकांची आढावा घेऊन मुक्त विद्यापीठाच्या अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्यात पुढील घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. काही विद्यापीठात घटक नसल्यास त्याला पर्यायी घटक निश्चित करण्यात आलेला आहे.

**अध्यापनविषयक क्षेत्रीय कार्य**

| क्र. | पूर्वीची कृती | पर्यायी कृती |
|---|---|---|
| १. | सूक्ष्म अध्यापन कौशल्य | सूक्ष्म अध्यापन कौशल्य कृतीसाठी पर्यायी कृती |
| २. | सरावपाठ | सरावपाठ |
| ३. | मानसशास्त्र प्रयोग | १) किशोरावस्थेतील / कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांचा व्यष्टी अभ्यास |

| | | |
|---|---|---|
| | | किंवा<br>२) एका विषयाचे वार्षिक नियोजन |
| ४. | व्याख्यान | व्याख्यान |
| ५. | नियोजन पुढीलप्रमाणे (कोणतेही दोन)<br>वार्षिक संमेलन, कार्यानुभव,<br>समाजकार्य आणि छात्रसेवाकाल | नियोजन पुढीलप्रमाणे (कोणतेही दोन)<br>वार्षिक संमेलन, कार्यानुभव, समाजकार्य आणि छात्रसेवाकाल |

विद्यार्थ्यांनी अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्यातील विविध कृती NCTE मान्यताप्राप्त बी.एड् महाविद्यालयात मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनासाठी करावयाच्या आहे. या कार्याची मौखिक परीक्षा अध्ययन आधार केंद्रावर घेण्यात येणार आहे. घटकनिहाय कृती आणि मूल्यामापन गुण सहपत्र ५ मध्ये देण्यात आलेले आहेत. अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्यातील कृती व मूल्यमापन कार्यवाही मान्यतेसाठी सादर..

**सहपत्र- 5**

**(५९.४.३)** – एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी 2023 पासून सेवापूर्वी आणि सेवांतर्गत अश्या दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे आंतरवसितेमध्ये एकुण सहा कृतींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यातील पाच कृती अनिवार्य अभ्यासक्रमाला व एक कृती वैकल्पिक अभ्यासक्रमाला अनुसरुन करण्यात आलेल्या आहे.

**आंतरवासिता कृती**

१. अनुभवी शिक्षकाच्या अध्यापनाचे निरीक्षण आणि विमर्षण
२. एका घटकाबाबत संविधान तक्ता विकसन त्याआधारे घटक चाचणी विकसन.
३. शाळा व्यवस्थापन समिती कार्याचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर झालेला परिणाम.
४. शालेय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध योजना.
५. वैकल्पिक विषयावर आधारित आंतरवासिता

| **शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन व नेतृत्व वैकल्पिक अभ्यास** | **विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन वैकल्पिक अभ्यास** |
|---|---|
| प्रशासकीय कार्यासाठी आवश्यक कौशल्यांचा शोध | समावेशित शाळेतील दिव्यांग विद्यार्थी अभ्यास |

एम.ए. शिक्षणक्रमात आंतरवासिते अंतर्गत वरील कृतीचा समावेश चर्चा व मान्यतेसाठी सादर

**सहपत्र-6**

**(५९.४.४)** – एम.ए. शिक्षणशास्त्र M-83 मूल्यमापन योजना- NEP 2020 नुसार विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील विविध घटकांच्या मूल्यमापनाबाबत दि. २६.१०.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली या बैठकांच्या वृत्तातास मा. कुलगुरुंची मान्यता घेण्यात आली.

1. तात्विक अभ्यास. 1.1) अंतर्गत कार्य 30% 1.2) अंतीम परीक्षा 70% 4 श्रेयांकासाठी (2 स्वाध्याय) आणि 2 श्रेयांकासाठी (1 स्वाध्याय) देण्यात येईल.

2. आंतरवासिता, क्षेत्रीय कार्य आणि संशोधन अहवाल अंतर्गत मूल्यमापन आणि बहिस्थ: मूल्यमापन सारांश 50:50 ठेवण्यात येईल.

पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या दि. २६.१०.२०२३ रोजी बैठकीत मान्य झालेल्या विविध घटकांच्या मूल्यमापन योजनेला मा.कुलगुरूंनी मान्यता देण्यात आलेली आहे.

**सहपत्र-7**

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

१) एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी सन २०२२ या वर्षात विकसित झालेल्या अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमांना आणि नव्याने समाविष्ठ केलेल्या नवीन चार अभ्यासक्रमांच्या घटक आणि उपघटकांबाबत चर्चा आणि मान्यतेसाठी सादर.

२) एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्यासाठी विकसित केलेल्या कृती चर्चा आणि मान्यतेसाठी सादर

३) एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी आंतरवासितेसाठी विकसित केलेल्या विविध कृती चर्चा आणि मान्यतेसाठी सादर

४) एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील विविध घटकांच्या मूल्यमापन योजना चर्चा आणि मान्यतेसाठी सादर.

**निर्णय –**

१. NEP 2020 नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी सन २०२२ मध्ये विकसित झालेल्या अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रमांना त्याचप्रमाणे नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या १. शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्वे (2 श्रेयांक ) २. ग्रंथालय आणि अध्ययन संसाधने (2 श्रेयांक) ३. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (४ श्रेयांक) ४. शैक्षणिक उद्योजकता – (4 श्रेयांक) अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रमांना मान्यता देण्यात आली.

२. NEP 2020 नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम अध्यापन विकास क्षेत्रीय कार्या अंतर्गत शिक्षणशास्त्र विद्याशाखेने निश्चीत केलेल्या सूक्ष्म अध्यापन कौशल्य, सराव पाठ, मानसशास्त्र प्रयोग १. किशोरवस्थेतील / कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांचा व्यष्टी अभ्यास किंवा एका विषयाचे वार्षिक नियोजन, व्याख्यान, नियोजन पुढीलप्रमाणे (कोणतेही दोन) वार्षिक संमेलन, कार्यानुभव, समाजकार्य आणि छात्रसेवाकाल.

३. NEP 2020 नुसार कृतींची एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम आंतरवासिते अंतर्गत कृतींना आणि मूल्यमापन योजनेला मान्यता देण्यात आली.

४. NEP 2020 नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील विविध घटकांच्या मूल्यमापन योजनेला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

५९.५ **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 5**

**बीएड शिक्षणक्रम सन 2024 शिक्षणक्रम प्रवेश नियमावली –**

**बी.एड. 2023-2025 प्रवेश प्रक्रिया करताना काही अडचणी लक्षात आलेल्या आहेत. सन 2024-2026 माहितीपुस्तिकेत याबाबत अधिक सुस्पष्टपणे मांडणी करण्यासाठी प्रवेश नियमावली मुद्दे मांडण्यात आलेली आहेत.**

NCTE प्रवेशाची पात्रता (Eligibility)

The following categories are eligible to be student of B.Ed (ODL)

i) Trained in service teachers in elementary education

ii) Candidate who have completed & NCTE recognized teacher education programme through face to face mode

iii) The reservation and relaxation in marks of SC/ST/OBC/PWD and other categories shall be as per the rules of the central Government/ State Government, whichever is applicable.

१. ऑनलाईन प्रवेश अर्जात डी.एड् /डी.टी.एड् / डी.एल. एड् / क्राफ्ट टीचर डिप्लोमा पूर्ण केलेले प्राथमिक स्तरावरील सेवांतर्गत शिक्षक स्वतंत्रपणे दाखविण्यात येतील ..

२. अनुभव वर्ष प्रतीवर्षी एक गुण देण्यात येतील. दिनांक 30 एप्रिल 2024 पर्यंत अनुभव विचारात घेण्यात येईल.

३. डी.एड् /डी.टी.एड् / डी.एल. एड् / क्राफ्ट टीचर म्हणून उत्तीर्ण झाल्यानंतरची सेवा प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

४. सैन्यदलातील आजी व माजी कर्मचारी / पत्नी किंवा त्यांचा मुलगा / अविवाहित मुलगी हे ज्या प्रवर्गातून प्रवेश होतील अशा उमेदवारांच्या त्या प्रवर्गातील जागा कमी करण्यात येईल. एका जिल्ह्यासाठी गुणवत्तेनुसार किमान एक व कमाल दोन जागा देण्यात येतील. यासंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय आणि परिपत्रक नुसार कार्यवाही करण्यात येईल.

५. दिव्यांग प्रवेशार्थीसाठी एकूण 5% जागा आहेत. ज्या दिव्यांग प्रवर्गातील अर्ज सर्वात कमी असतील त्यांना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्यानंतर कमी असलेल्या प्रवर्गाचा विचार करण्यात येईल. त्यानंतर जास्तीत जास्त संख्या असलेल्या दिव्यांगाचा विचार करण्यात येईल. एका जिल्ह्याला जास्तीत जास्त 3 दिव्यांगाना प्रवेश देण्यात येईल कोण्त्याही परिस्थितीत 75 पेक्षा जास्त दिव्यांगांना प्रवेश दिला जाणार नाही. दिव्यांगांचे 5 टक्के पेक्षा जास्त प्रवेश होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

१) **Physical Disabilities**- Locomotor or disability, Leprosy cured person, Cerebral Palsy, Dwarfism, Muscular Dystrophy, Acid Attack Victims, Blindness, Low-Vision, Hard of Hearing Speech and Language Disability, Deafness.

२) **Intellectual Disability**- Intellectual Disability, Specific Learning Disabilities, Autism Spectrum Disorder.

३) **Mental Behavior**-Mental Illness

४) **Disability due to causes**- Multiple Sclerosis, Parkinson disease, Haemophilia, Thalassemia, Sickle Cell disease.

५) **Multiple Disabilities**- Multiple Disabilities

६. पदवीधर वेतनश्रेणीबाबत – ज्या प्राथमिक शिक्षकांना शासनाने प्रत्यक्ष पदवीधर वेतनश्रेणी देऊन पाच /सात वर्षांच्या आत बी.एड. शिक्षणक्रम पूर्ण करण्याची अट लेखी स्वरूपात घातलेली आहे,अशा शिक्षकांना तसे पत्र दाखवल्यानंतर पदवीधर वेतनश्रेणी मिळाल्यापासून प्रत्येक वर्षासाठी एकअतिरिक्त गुण देण्यात येईल.ज्या पदवीधर शिक्षकांना 5-7 वर्षात बी.एड.पूर्ण करण्याबाबतच नियुक्त पत्रात उल्लेख नसेल परंतू शासन निर्णय संदर्भ त्यांच्या नियुक्त आदेश असल्यास शासनाकडून त्यांच्या शाळेच्या order मध्ये पदवीधर वेतन श्रेणीचा उल्लेख असून त्यांच्या सेवापुस्तिकेत 5-7 वर्षात नोंद असल्यास ते पदवीधर वेतन श्रेणींचे गुण देण्यात येतील. बी.एड पूर्ण करावे.

७. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये 10% जागा आरक्षित करणेबाबत.

शासन निर्णय क्र. राआधो- 1019 /प्र.क्र.31 /16-अ दिनांक 12 फेब्रुवारी 2019 निर्णयानुसार जे प्रवेशार्थी आर्थिक दुर्बल घटकांमधून प्रवेश अर्ज भरतील त्यांना सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. ज्या प्रवेशार्थीने चुकीची माहिती देऊन प्रमाणपत्र घेतलेले असल्यास आणि ते सिध्द झाल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल. त्याला कोणतेही शुल्क परत मिळणार नाही. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय, परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८. **श्रेणी वरुन गुण धरणेबाबत..** पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रेणीच्या आधारे प्रवेशार्थीनां अतिरिक्त गुण देण्यात येतात.

विद्यापीठामध्ये पूर्वी 5 Point scale नुसार श्रेणी आणि Range देण्यात येत असे परंतु UGC च्या नवीन नियमानुसार 10 Point scale वापरण्यात येत आहे. या दोन्ही श्रेणीमध्ये तफावत असल्यामुळे प्रवेशार्थीच्या श्रेणीत बदल होतो.

**5 point Scale** **10 point Scale**

| Letter Grade Points Scale | Range of Percentage of Marks | | Academic standards | Letter Grades | Range of Percentage of Marks |
|---|---|---|---|---|---|
| O | 75 & Above | | Out Standing | o | 90.00-100 |
| A | 60 To 74.49 | | Excellent | A+ | 80.00-<90.00 |
| B | 49.50 To 59.49 | | Very Good | A | 70.00-<80.00 |
| C | 40To 49.49 | | Good | B+ | 60.00-<70.00 |
| D | Below 40 | | Above Average | B | 55.00-<60.00 |
| | | | Average | C | 50.00-<55.00 |
| | | | Pass | P | 40.00-<50.00 |
| | | | Fail | F | Below-40 |
| | | | Absent | AB | - |

विद्यार्थ्यांने प्रवेश अर्जामध्ये टक्केवारी काढण्यासाठी पुढील सूत्रांचा वापर करावा. पदवी आणि पदव्युत्तर टक्केवारी काढण्याचे सूत्र CGPA * 10-7.5

पदवी आणि पदव्युत्तर पदवीची टक्केवारी काढण्यासाठी वरील सूत्राचा वापर करून त्याला जी टक्केवारी येईल ती ५ point scale नुसार त्या श्रेणीच्या टक्केवारी बसेल ती श्रेणी बी.एड. प्रवेशाच्या गुणासाठी ग्राह धरण्यात येईल.

९. **विशेष मागास प्रवर्गात प्रवेश देणेबाबत ..**

विशेष मागास प्रवर्गातील काही जाती पूर्वी मागासवर्गामध्ये होत्या नंतर त्यांचा विशेष मागास प्रवर्गात समावेश करण्यात आलेल्या आहे. प्रवेशार्थीना प्रवेशाच्या वर्षी तो ज्या प्रवर्गात असेल तोच प्रवर्ग गृहीत धरण्यात येईल यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय आणि परिपत्रक लागू राहतील.

१०. बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी ज्या जागा रिक्त राहतील त्या जागा पुढीलप्रमाणे भरण्यात येतील.

OPEN(खुला प्रवर्ग) ↔ EWS(अर्थिक मागास प्रवर्ग)
अनुसूचित जाती(SC) ↔ अनुसूचित जमाती(ST)
विमुक्त जाती (VJ-A) ↔ भटक्या जाती ( NT-B)
भटक्या जमाती(NT-C) ↔ भटक्या जमाती( NT-D)

सर्व राखीव प्रवर्गातील जागा भरल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास 2 % जागा SBC प्रवर्गासाठी देण्यात येतील.

| | |
|---|---|
| | **निर्णय** — बी.एड २०२४-२०२६ प्रवेश नियमावलीतील मुद्दा क्र. १, २, ३, ४, ५ मान्य करण्यात आले. मुद्दा क्र. 3 बाबत गटशिक्षणधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र अधिकृत धरण्यात यावे. मुद्दा क्र. ६ बाबत ज्या उमेदवारांच्या नियुक्त अर्जांत बी.एड. ५-७ वर्षांत पूर्ण करावे अन्यथा वेतन रोखण्यात येईल. असा उल्लेख असेल किंवा शाळेच्या order मध्ये नोंद असेल आणि उमेदवाराच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद असल्यास पदवीधर वेतन श्रेणींचे गुण देण्यात यावेत. मुद्दा क्र. ९ शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ५९.६ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 6**<br>**विषय :** एकात्मिक बी.ए.बी.एड., बी.एससी.बी.एड. आणि बी.कॉम. बी.एड. शिक्षणक्रम नियमित पद्धतीने सुरु करणेसाठी तयार केलेली संरचना मान्यतेबाबत<br><br>**टिप्पणी** —<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेत इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या धर्तीवर एकात्मिक बी.एड. (बी.ए.बी.एड., बी.एससी.बी.एड. आणि बी.कॉम. बी.एड.) सुरु करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाला ना हरकत प्रमाणपत्रासाठी पाठविण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने त्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने NCTE कडे प्रस्ताव पाठविण्यासाठी सदर एकात्मिक बी.एड. ची संरचना तयार केली आहे. ती संरचना तयार करत असतांना NCTE ने प्रसिद्ध केलेली curriculum framework विचारात घेण्यात आली. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील तज्ज्ञांच्या दोन बैठका आयोजित करण्यात आल्या. समिती सदस्यांच्या चर्चेतून तयार झालेली संरचना शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**(सहपत्र-8)**<br>**निर्णय** — शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत नियमित पद्धतीने सुरु करण्यात येणाऱ्या एकात्मिक बी.ए. बी.एड, बी.कॉम बी.एड, बी.एस्सी बी.एड शिक्षणक्रम संरचनेस मान्यता देण्यात आली. NCTE कडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मान्यता देण्यात आली. |
| ५९.७ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 7**<br>**विषय ५९.७.१ :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास Art Master (AM) पात्रता असणा-या प्रवेशार्थीना प्रवेश देणे बाबत..<br>**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम कार्यान्वित आहे. सदरील शिक्षणक्रमास १) युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठ पदवीधर व्यक्ती **किंवा** २) मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक असे नियुक्तपत्र असलेल्या व्यक्तीना प्रवेश दिला जातो.<br>ATD व AM पात्रता धारण करणारे प्रवेशार्थी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करतात.<br>मा.कुलगुरूंकडे धारिका क्र. दि. २३.११.२०२३ रोजी ATD व AM पात्रता धारण करणा-या प्रवेशार्थीच्या विनंती अर्जानुसार शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रस्ताव अंतर्गत संज्ञापन पत्राद्वारे केला होता. सदरील प्रस्ताव मा. कुलगुरूंनी विद्याशाखा परिषदेच्या मान्यतेच्या अटीसह मान्य केला आहे.<br>**(सोबत : सहपत्र -९.१)**<br>Art Master (AM) हा शिक्षणक्रम युजीसी अंतर्गत येत नसून तो DIRECTORATE OF ART: MAHARASHTR STATE या अंतर्गत येतो. DIRECTORATE OF ART : MAHARASHTR STATE याच्या पत्रानुसार AM हा शिक्षणक्रम पदवी समकक्ष आहे.<br>**(सोबत : सहपत्र -९.२)** |

| | |
|---|---|
| | तसेच शासनाकडून या Art Master प्राप्त शिक्षकांना Graduate Teachers Category Scale दिले जात आहे. त्यामुळे हे शिक्षक या DSM शिक्षणक्रमास प्रवेशासाठी अर्ज करतात.<br>**(सोबत : सहपत्र -९.३)**<br><br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर** : Art Master ही पदवी, पदवीला समकक्ष असल्यामुळे AM पात्रता धारण करणाऱ्या प्रवेशार्थींना शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रवेश देण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव चर्चा व मान्यतेस्तव सादर.<br><br>**निर्णय** — शासनाने AM ह्या पदवीला पदवी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे, म्हणून शालेय व्यवस्थापन पदवी शिक्षणक्रमासाठी AM पात्रता धारक शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ पासून प्रवेशास मान्यता देण्यात आली.<br><br>**विषय विषय ५९.७.२** : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास ATD पात्रता असणा-या प्रवेशार्थींना प्रवेश देणे बाबत..<br>**टिप्पणी** : ATD ही पदविका आहे. त्याला पदवीचे समकक्षत्व महाराष्ट्र शासनाने दिलेले नाही. मात्र ATD पात्रताधारण करणारे शिक्षक देखील या शिक्षणक्रमासाठी प्रवेशासाठी अर्ज करतात.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर** : ATD डिप्लोमा पात्रता धारण करणाऱ्या प्रवेशार्थींना शिक्षकांना शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून मान्यता देण्यासाठी प्रस्ताव चर्चा व मान्यतेस्तव सादर..<br>**निर्णय** — ATD ही पदविका असल्यामुळे ही पदविका असणाऱ्या उमेदवारांना शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास प्रवेश देऊ नये असा निर्णय घेण्यात आला. |
| ५९.८ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 8**<br>**विषय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र,बी.एड.विशेष बी.एड. शिक्षण,शालेय व्यवस्थापन पदविका प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावास मान्यते बाबत...<br>**टिप्पणी** : संचालक मूल्यमापन विभाग यांनी दि. २९.११.२०२३ च्या अंतर्गत पत्राद्वारे शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या शिक्षणक्रमाच्या संदर्भात प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावे मागविली आहे. विद्याशाखेने अभ्यासकेंद्रावर कार्य करणा-या तज्ज्ञ व्यक्तींची नावे प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी पत्राद्वारे मागविली आहे. सदरील प्राप्त झालेली नावे विद्याशाखा परिषदे समोर चर्चा व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर..<br>**(सहपत्र — 10)**<br><br>**प्रस्ताव:** शिक्षणशास्त्र विद्याशाखे मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमामध्ये स्वयंअध्यापन साहित्य लेखक म्हणून कार्य केलेले त्याचप्रमाणे अभ्यासकेंद्रावरील समंत्रंक हे प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावास मान्यतेसाठी विद्याशाखा परिषदे समोर प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फात राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांच्या मूल्यमापना संदर्भातील कामासाठी त्याच्या शिक्षणक्रमातील स्वयंअध्यापन साहित्य लेखक संपादक अभ्यासकेंद्रा वरील समंत्रक ह्यांना मान्यता देण्यात आली. या व्यक्तीरिक्त व्यक्तींना घेण्यासाठी संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांना अधिकार देण्यात आले. |

| | |
|---|---|
| ५९.९ | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 9**<br>**विषय:**- यचममुवि ग्रंथ दालन (YCMOU BOOK CORNER) योजना मान्यते बाबत<br>**टिप्पणी:**- आपल्या विद्याशाखेतील सर्व अध्ययनार्थी अध्ययन सहायता केन्द्रावर (अभ्यासकेन्द्र) संबंधीत महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मध्यवर्ती ग्रंथालयात सर्वांसाठी "यचममुवि ग्रंथ दालन विकसित केल्यामुळे त्याचा उपयोग पुढील प्रमाणे होईल<br>१ आपल्या अध्ययनार्थी व सर्वसमंत्रका बरोबरच महाविद्यालयातील / संबंधित सर्व अध्यापक व विद्यार्थ्यांना ही संदर्भासाठी व अधिकतम अध्ययनासाठी होईल.<br>२ याचा उपयोग NAAC व तत्सम संस्थांच्या मुल्यांकनातही बेस्ट प्रॅक्टीसेस म्हणून केला जाऊ शकेल.<br>३ आपल्या विद्यापीठाच्या प्रचारप्रसारात व नावलौकिकात भर पडेल<br>त्या करिता पुढील बाबी अभ्यासकेद्रावर करणे अपेक्षित आहे.<br>i. अध्ययनार्थी अध्ययन सहाय्यता केंद्रावरील उपलब्ध असलेली जुनी यचममुविची पाठ्यपुस्तके, मार्गदर्शिक इ. एका स्वतंत्र कपाटात किंवा स्वतंत्र कप्प्यात उचित ग्रंथालयीन संस्कार नोंदीसह ठेवावेत.<br>ii. विद्यापीठाने योजनेसाठी पाठ्यपुस्तके पाठवताना या वर्षी किंवा पुढील वर्षी एक जादा पाठयपुस्तकाचा संच पाठवावा.<br>iii. ग्रंथालयाच्या ग्रंथ नोंद पुस्तकात सविस्तर नोंद करून यचममुवि ग्रंथदालन सर्वांसाठी खुले ठेवण्यात यावे.<br>iv. मुक्त व दूर शिक्षण विषयी लेखांची कात्रण फाईल त्यात असावी उदा. संवाद पत्रिका व इतर नियतकालिके लेख इ.<br>**प्रस्ताव**- वरिल प्रमाणे य.च.म.मु.वि. ग्रंथ दालन योजना अभ्यासकेन्द्रावर कार्यान्वीत करण्यास मान्यता द्यावी, यासाठी सादर.<br>**निर्णय**- अध्ययन सहाय्यता (अभ्यासकेंद्र) केंद्रावर यचममुवि ग्रंथ दालन (YCMOU Corner) योजनेस मान्यता देण्यात आली. |
| ५९.१० | **विषय क्र. बी.-1 / एफ-178 / 2023/ 10**<br>**५९.१०.१ विषय: सामंजस्य करार केलेल्या शाळेस प्रात्यक्षिक कार्य खर्च देण्याबाबत...**<br>**टिप्पणी:** बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्ली यांचेशी विद्यापीठाने सामंजस्य करार केलेला आहे. RCI च्या नियमाप्रमाणे मुख्यालयातील अभ्यासकेंद्राने प्रशिक्षानार्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबधित शाळेशी सामंजस्य करार करणे बंधनकारक केलेले आहे. संबधित शाळेला प्रती विद्यार्थी प्रती सत्र रु.४००/- इतके मानधन दिल्यास शाळेकडून सहकार्य मिळेल असे वाटते. या सर्व बाबीं सहपत्र १ मध्ये सोबत जोडण्यात आल्या आहेत. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर... **(सहपत्र 11)**<br>**प्रस्ताव:** बी.एड विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या प्रात्यक्षिक कार्यासाठी विशेष शाळांना प्रतिसत्र प्रति विद्यार्थी रु. ४००/- देण्यावावत चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय** — बी.एड विशेष शिक्षणक्रमासाठी मुख्यालायातील अभ्यास केद्रांसाठी विशेष शाळांमध्ये प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी प्रति सत्र प्रति विद्यार्थी रु. ४०० /- न देता सत्र निहाय विशेष शाळेतील प्रात्यक्षिक कृती निश्चित करण्यात यावी. नियमित बी.एड मधील समान कार्याबाबत दर समकक्ष ठेवावेत. इतर कार्यांबाबत कृती, उपकृती आणि शाळेतील संबंधित व्यक्तींचे कार्य निश्चित करून त्याआधारे मानधन निश्चित करण्यात यावे. हे मानधन अभ्यासकेंद्राच्या मानधनातून संबंधित विशेष शाळांना देण्यात यावे. |

| | |
|---|---|
| | **५९.१०.२ विषय: बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२७ पासून प्रवेश परीक्षा घेण्याबाबत...**<br>**संदर्भ ५८.११.२**<br>**टिप्पणी:** बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या सन २०२४ -२७ प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित करण्यासाठी भारतीय पुनर्वास परिषद (RCI) यांच्या कडून सन २०२१ च्या नियमावलीनुसार बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रवेश परीक्षा देणे बंधनकारक केले आहे (सहपत्र क्र.२) . प्रवेश परीक्षा घेण्यासाठी विद्वत परिषदेचे अध्यक्ष मा. कुलगुरू यांनी सन २०२३-२६ साठी प्रवेश परीक्षेच्या अभ्यासक्रमास व प्रस्तावास मान्यता दिलेली होती (सहपत्र क्र.२). तरी विद्यापीठस्तरावर काही तांत्रिक अडचणी आल्याकारणाने सन २०२३-२०२४ वर्षाचे प्रवेश प्रक्रिया मुलाखत आणि कागदपत्र पडताळणी करून पूर्ण करण्यात आलेली आहे.<br>**प्रस्ताव:** सन २०२४-२०२६ ची प्रवेश प्रक्रिया संदर्भ. 58.११.2 नुसार मान्य झालेला निर्णयानुसार प्रवेश पात्रता परीक्षा आणि कागदपत्र पडताळणी करून प्रवेश देण्यास प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर... **(सहपत्र 12)**<br>**निर्णय** — बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद नुसार मान्य झालेला निर्णयानुसार सन २०२४-२०२६ प्रवेश पात्रता परीक्षा मान्य अभ्यासक्रमानुसार कार्यपद्धती करण्यास चर्चेअंती मान्यता देण्यात आली. |
| ५९.११ | **ऐनवेळचा विषय**<br>**NEP 2020 एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीच्या बैठक वृत्तांतास मान्यता**<br>**टिप्पणी** : एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची तज्ज्ञ सल्लागार समितीची बैठक दि. १२/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीत NEP 2020 नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमंना मान्यता, अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता आणि संपूर्ण शिक्षणक्रमातील विविध घटकांच्या मूल्यमापन योजना सदर करण्यात आलेली होती. या बैठकीच्या वृत्तांतास मान्यता द्यावी ही विनंती.<br>**(सहपत्र 13)**<br>**निर्णय** : एम.ए. शिक्षणशास्त्र (M83) शिक्षणक्रमाच्या दिनांक १२/१२/२०२३ रोजी झालेल्या तज्ज्ञ सल्लगार समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाला विद्याशाखा परिषदेत मान्यता देण्यात आली. |

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यता आले.

प्रा.विजयकुमार पाईकराव,
**सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद**

प्रा.संजीवनी महाले,
**अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद**

**मान्य/ अमान्य**

**मा.कुलगुरू ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर...........**